महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
Vani - Dindori Road, Mhasrul, Nashik - 422 004.
EPABX : 0253-2539100-300, Fax : 0253-2539171, Phone : 0253-2539173
E-mail : sw@muhsnashik.com Web.: www.muhsnashik.com

डॉ. काशिनाथ दा. गर्कळ
एम.एससी., पीएच.डी.
संचालक - विद्यार्थी कल्याण

Dr. Kashinath D. Garkal
M.Sc., Ph.D
Director – Students' Welfare

All correspondence be addressed to the Registrar

33

मआविवि/एसडब्ल्यू/एनएसएस/१५८८ /२०११ दि. ३०/११/२०११

(31)

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य,

श्रीमती विमलादेवी आयुर्वेदिक मेडिकल
कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल, जि. चंद्रपूर

SVAMC
IW No. 249
Date 2/12/2011

विषय : सन २०११-१२ या वर्षापासुन पुढे राष्ट्रीय सेवा योजना एकक ( N.S.S. Unit ) सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.

संदर्भ : आपले पत्र क्र. दि. ११/०९/२०११

महोदय / महोदया,

वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भांकित पत्राद्वारे आपण राष्ट्रीय सेवा योजना एककाची (N. S. S. Unit) मागणी केली आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयास ..५०.. स्वयंसेवक (विद्यार्थी) संख्येचे राष्ट्रीय सेवा योजना एकक (N.S.S. Unit) सन २०११-१२ यावर्षापासून पुढे सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

राष्ट्रीय सेवा योजना ही केंद्र व राज्य शासन यांची संयुक्तरित्या पुरस्कृत योजना आहे. विद्यापीठास सलंग्नित व इच्छुक महाविद्यालयांनाच राष्ट्रीय सेवा योजना एकक देण्यात येते. ह्या योजनेअंतर्गत नियमित व विशेष शिबीर असे दोन उपक्रम राबविले जातात. सदर उपक्रम राबविण्यासाठी शासनाकडुन अनुदान मिळते. त्यामुळे रासेयो एकक महाविद्यालयांनी दोन्हीही कार्यक्रम राबविणे अनिवार्य आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक सुरु करतांना व एकक कार्यरत असतांना आपणांस खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे:-

१. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे कामकाज पाहण्यासाठी एक कार्यक्रम अधिकारी व दोन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (एक पुरुष व एक महिला) यांची नियुक्ती करावी. रासेयो कार्यक्रम अधिकारी हे प्रपाठक (**Reader**) किंवा व्याख्याता (**Lecturer**) स्तरावरचे असावेत. रासेयो कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांची माहिती सोबत जोडलेल्या नमुन्यात विद्यापीठास पाठवावी.

२. राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी नियुक्त केलेले कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांनी कमीत कमी ३ वर्षे काम करणे बंधनकारक राहील. त्यांचे नियुक्तीपत्र व ३ वर्षे काम करण्याचे हमीपत्र विद्यापीठास पाठवावे. रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी टी.ओ.सी. (T.O.C.) अहमदनगर यांच्याकडुन ०७ दिवसांची रासेयो परिचय प्रशिक्षण कार्यशाळा (Orientation Training) आयोजित केली जाते. सदर कार्यशाळेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांना विद्यापीठाकडुन आदेश प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षणासाठी पाठवावे. प्रत्येक कार्यक्रम अधिकाऱ्यांनी एकदा रासेयोचे परिचय प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे.

३. शासनाकडुन विद्यापीठास प्रत्येकवर्षी रासेयोचे कार्यक्रम राबविण्यासाठी मिळालेले अनुदान रासेयो एकक महाविद्यालयांना एकक संख्येनुसार वाटप करण्यात येते. त्यामुळे महाविद्यालयातील रासेयो एककाचे राष्ट्रीयकृत बॅकेत स्वतंत्र संयुक्तीक खाते उघडावे. सदर खाते महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने परिचालन करावे. विद्यापीठाकडुन मिळालेले अनुदान सदर खात्यातच जमा करावे व रासेयोशी निगडीत सर्व व्यवहार या खात्यामधुनच करावा. तसेच रासेयो एककाचे खाते असलेल्या बॅकेचे नाव व खाते नंबर विद्यापीठास कळवावे.

Principal
Smt. Vimaladevi Ayurvedic
College & Hospital, Chandrapur

राष्ट्रीय सेवा योजनेत स्वयंसेवकांची नोंदणी [illegible] शक्यतो महाविद्यालयात द्वितीय व तृतीय [illegible] प्रवेशित विद्यार्थ्यांचीच नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या स्वयंसेवकांची प्रवर्गनिहाय नावांची यादी सोबत जोडलेल्या नमुन्यात विद्यापीठास पाठवावी. रासेयोत सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाकडुन दरवर्षी रु. १०/- रासेयो स्वयंसेवक नोंदणी शुल्क घेण्यात यावे (N. S. S Contribution). सदर नोंदणी शुल्क धनाकर्षाद्वारे "Director Student's Welfare, MUHS, Nashik" यांच्या नावे स्वयंसेवकांच्या यादीसोबत विद्यापीठाकडे पाठवावे. स्वयंसेवकांच्या यादीसोबत विहीत शुल्काचा धनाकर्ष नसल्यास सदर स्वयंसेवकांची नोंदणी केली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

५. रासेयो अंतर्गत विशेष शिबीर कार्यक्रम शक्यतो दि. १५ ऑगस्ट ते २८ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करावे व तद्नंतर नियमित व विशेष शिबीर कार्यक्रमाच्या संपुर्ण जमा खर्चाचे वेगवेगळे (Separately) हिशोब सनदी लेखापरिक्षकाकडुन (C. A.) लेखापरीक्षण घ्यावे. महाविद्यालयास प्रत्येक आर्थिक वर्षासाठी देण्यात येणाऱ्या नियमित व विशेष शिबीर कार्यक्रमाच्या अनुदानाचे हिशोब कुठल्याही परिस्थितीत प्रत्येकवर्षी दि. १० एप्रिल पर्यंत विद्यापीठास प्राधान्यक्रमाने पाठवावे. रासेयोच्या कार्यक्रमांसाठी खरेदी केलेल्या वस्तुंच्या बिलाची छायांकित प्रत अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या सहीने साक्षांकित करुन हिशोबाबसोबत पाठवाव्यात. सदर हिशोब वेळेत प्राप्त न झाल्यास आपल्या महाविद्यालयाने सदर वर्षाचे अनुदान खर्च केले नाही असे समजून देण्यात आलेले अनुदान महाविद्यालयाकडुन परत घेण्यात येईल. तसेच महाविद्यालयातील रासेयो एकक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम राबविण्यास अकार्यक्षम आहे असे समजून बंद करण्यात येईल याची कृपया अधिष्ठाता / प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांनी विशेष नोंद घ्यावी.

६. रासेयोचे नियमीत कार्यक्रम व विशेष कार्यक्रम घेण्याविषयीची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्टांमध्ये (Appendix) देण्यात आलेली आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने रासेयोचे कार्यक्रम राबवावे व त्याचा अहवाल विहित केलेल्या कालावधीत विद्यापीठास पाठवावा.

७. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांनी नियमित कार्यक्रमांमध्ये दोन वर्ष (प्रति वर्ष १२० तास) तसेच मंजूर केलेल्या एकक संख्येच्या ५०% स्वयंसेवकांनी सात (०७) दिवसांच्या विशेष शिबीर कार्यक्रमात एकदा सहभागी होणे बंधनकारक राहिल. सदर बाबींची पूर्तता करणाऱ्या स्वयंसेवकांना त्यांच्या अंतिम परिक्षेत पास होत असल्यास अतिरिक्त ०५ (पाच) गुणांचा लाभ तसेच रासेयोचे सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

८. महाविद्यालयातील रासेयो एककाचा ४ फुट × ३ फुट आकाराचा फलक तयार करुन महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर लावावा.

वर नमुद केलेल्या बाबीपैकी सध्या विद्यापीठास पाठवावयाच्या काही बाबींची पूर्तता करुन सदर माहिती विद्यापीठास दि. १०/१२/२०११ पर्यंत प्राधान्यक्रमाने पाठवावी.

आपला विश्वासु

30/11/2011

संचालक,
विद्यार्थी कल्याण तथा रासेयो समन्वयक

**सोबत :-**

१ परिशिष्ट 'अ' ते 'ग' (Appendix 'A' to 'G')
२. कृती आराखडा (Action Plan)
३. हिशोब सादर करण्याचा नमुना (Account Format)
~~४. रासेयो पुस्तिकेची (NSS Mannual) छायांकित प्रत.~~

Principal
Smt. Vimaladevi Ayurvedic College & Hospital, Chandrapur

Principal
Smt. Vimaladevi Ayurvedic College & Hospital, Chandrapur